Pimpalner Education Society's

**KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE, PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.**

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

**7.1.1: Institution has initiated the Gender Audit and measures for the promotion of gender equity during the last five years. Describe the gender equity & sensitization in curricular and co-curricular activities, facilities for women on campus etc.**

**Response:**

Kindly refer the list of programs conducted in academic year 2020-21.

| Sr. No. | Name of the activity | Date of organization | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Workshop on Gender Equality (Online) | 18/08/2020 | 2-3 |
| 02 | State Level Elocution Competition on Women's Day (Online) | 11/03/2021 | 4-9 |
| 03 | International Yoga Day (Offline) | 21/06/2021 | 10-14 |

Karmvee A. M. Patil Arts, Commerce & Kai. Annasaheb N. K. Patil Sci. Sr. College, Pimpalner, Tal. Sakri, Dhule. P.E.S.

Pimpalner Education Society's

**KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND**

**KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,**

**PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.**

e-mail: kamp_sr_college@yahoo.in | Web: http://www.kampsrcollege.org.in

Phone: 02561-223010 | Offg. Prin. K. D. Kadam

**Outward No:** **Date: / /202**

# Workshop on Gender Equality
## Date: 18/08/2020

महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने दिनांक 18 ऑगस्ट 2020 रोजी लिंग समभाव कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा झूम ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. स्त्रियांचे समाजातील स्थान हे नेहमीच दुय्यम राहिलेले आहे. ती एक समाजाची स्त्रियांच्या प्रती असलेली सामाजिक धारणा झालेली आहे. अशा या अन्यायकारक स्त्री विषयक सामाजिक धारणांना छेद देण्यासाठी व समाजात स्त्री -पुरुष यांच्यात लिंग समभाव निर्माण करण्यासाठी स्त्रियांबरोबरच पुरुषांनाही आचरण करणे आवश्यक आहे हा विचार विद्यार्थ्यांमध्ये रूढ होण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, स्त्रियांना जर सामाजिक जाचक रूढी परंपरातून स्वतःची सुटका करून घ्यावयाची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. तेव्हा स्त्रियांनी शिक्षण घेतलेच पाहिजे व स्त्री शिक्षणासाठी काम केले पाहिजे असे आव्हान त्यांनी केले. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी प्रास्ताविक व आभार मानलेत. महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी ऑनलाईन पद्धतीने या कार्यक्रमाला जॉईन झाले होते.






### विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

आज सर्वच क्षेत्रात स्त्रीया या पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. त्यामुळे पुरुषार्थ हा फक्त पुरुषांचा नसतो तर तो स्त्रियांचा देखील असतो. तसेच पुरुषार्थ कितीही मोठा असो परंतु त्याचा जन्म हा स्त्रीच्या कुशीतच होतो असे प्रतिपादन धुळे येथील प्रा. डॉ. उषा साळुंखे यांनी केले. त्या पिंपळनेर येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित ऑनलाईन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी बोलत होत्या. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कॉलेज कमिटीचे चेअरमन श्री. धनराज राजमल जैन तर प्रमुख अतिथी म्हणून सि. गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, पिंपळनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, परिक्षक म्हणून प्रा. डॉ. पौर्णिमा वानखेडे (धुळे) व श्री. भागवत सोनवणे (धुळे) हे उपस्थित होते.

प्रा. डॉ. उषा साळुंके पुढे म्हणाल्यात की, आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात तरुणींनी तंत्रज्ञानाचा उपयोग योग्य पद्धतीने केला पाहिजे. सौंदर्य हे दिसण्यात नसून आपल्या कलाकृतीत आहे. सौंदर्याचा अभिमान बाळगू नका आणि न्यूनगंड देखील बाळगू नका. आपले मत ठामपणे व्यक्त करायला शिका असे आवाहन देखील त्यांनी उपस्थितांना केले. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे म्हणाले की, स्त्रियांचे सौंदर्य हे छोट्या छोट्या गोष्टीत अर्थात त्यांचे चालणे, बोलणे, वागणे यामध्ये असते. घरातील स्त्रियांचा सन्मान झाला पाहिजे. कुटुंबात त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, समाजामध्ये दोन प्रकारच्या स्त्रीया असतात. एक निमूटपणे सहन करणारी आणि दुसरी साहसी वृत्तीची. निमूटपणे सहन करणारी स्त्री जिथे आहे तिथेच आहे. परंतु साहसी स्त्री मात्र परिवर्तनवादी असते. आज टीव्हीवरील वेगवेगळ्या स्त्रीप्रधान मालिकांमुळे ग्रामीण भागातील स्त्रीयांमध्ये हळू-हळू बदल होताना दिसत आहेत. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना श्री. धनराज शेठ जैन म्हणाले की, महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवित असते याचा मला विशेष आनंद आहे.

या स्पर्धेत एकूण २१ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यातील१. प्रथम क्रमांक: रु. २१००/- रोख कु. चौधरी रूपाली कन्हैयालाल (कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर)२. द्वितीय क्रमांक: रु. १५००/- रोख कु. महाजन हिमानी विकास (डॉ. जी. डी. बेंडाळे महाविद्यालय, जळगाव)३. तृतीय क्रमांक: रु. १०००/- रोख गवळी निशा जानकीराम (सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)हे विजेत्या पदाचे मानकरी ठरले आहेत. परिक्षकांच्या वतीने प्रा.डॉ. पौर्णिमा वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व यशस्वी व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन केले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. पी. एम. सावळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी केले. या कार्यक्रमास पिंपळनेर, साक्री, दहिवेल, धुळे, बोराडी या महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, निवृत्त प्राध्यापक / प्राध्यपकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी ऑनलाईन जॉईन झाले होते.

https://www.youtube.com/playlist?list=PLysStQFzlKiNc56ZnZVyYJowBXB_2kZbp

# माहितीपत्रक

कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव संलग्नीत

पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटी संचालित, नॅक पुर्नमुल्यांकन ‘ब’ श्रेणी प्राप्त

## कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र)

यांच्या विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित






## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा (State Level Elocution Competition)

## कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी



**उदघाटक**
मा. प्रा.डॉ. सौ. उषा साळूंखे
(सेवानिवृत्त प्राध्यापिका, कमलाबाई अजमेरा महाविद्यालय, धुळे)



**प्रमुख अतिथी**
मा. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे
( सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)



**अध्यक्ष, संयोजन समिती**
मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे
(पिंपळनेर महाविद्यालय)



**कार्यक्रमाचे अध्यक्ष**
मा. श्री. धनराज राजमल जैन
(चेअरमन, कॉलेज कमिटी, पि. ए. सो.)

## स्पर्धेचे विषय:

- भारतीय महिला … सशक्त महिला
- बेटी बचाव बेटी पढाओ
- महाराष्ट्रातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या यशोगाथा
- स्त्री भ्रूण हत्या एक सामाजिक समस्या
- महिला अत्याचार एक जागतिक समस्या

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक २१०० रुपये | स्पर्धा: गुरू., दि. ११ मार्च २०२१ |
| द्वितीय पारितोषिक १५०० रुपये | वेळ : स. १०.३० वा. |
| तृतीय पारितोषिक १००० रुपये | स्थळ: झुम ॲप |

## स्पर्धेचे नियम

- स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने झूम ॲप वर घेण्यात येईल. स्पर्धेचे माध्यम मराठी असेल.
- स्पर्धक विद्यार्थी-विद्यार्थिनी हा वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेशित असावा. त्यासाठी त्याने आय कार्ड ची फोटो कॉपी डॉ. एस. पी. खोडके यांच्या 9420374077 या व्हाट्सअप नंबर वर पाठवावे.
- स्पर्धेसाठी सात मिनिटांचा कालावधी दिला जाईल (६ + १).
- स्पर्धेसाठी सोबत पाठविलेली लिंक वर क्लिक करून नोंदणी करणे आवश्यक आहे.
- दि. १० मार्च (बुध.) २०२१, सायं. ५.०० वा. पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर स्पर्धकांना संधी दिली जाणार नाही.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

### संयोजन समिती

**प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे**
(अध्यक्ष, संयोजन समिती)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा. वाय. एम. नांद्रे | प्रा. पी. एम. सावळे | प्रा. सी. एन. घरटे | डॉ. एस. पी. खोडके |
| (सहा. कार्यक्रम अधिकारी) | (सहा. कार्यक्रम अधिकारी) | (रासेयो कार्यक्रम अधिकारी) | (विद्यार्थी विकास अधिकारी) |
| (9421536308) | (9421618258) | (7588910664) | (9420374077) |

**कार्यक्रमाची रूपरेषा: स्वागत**

प्रास्ताविक: प्रा. सी. एन. घरटे

अतिथींचा परिचय: प्रा. पी. एम. सावळे

मा. उदघाटकांचे मनोगत: प्रा. डॉ. सौ. उषा साळूंखे,
(सेवानिवृत्त प्राध्यापिका, कमलाबाई अजमेरा महाविद्यालय, धुळे)


मा.प्रमुख अतिथींचे मनोगत: मा. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे,
(सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)

मा. प्राचार्य यांचे मनोगत: मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे

मा. अध्यक्ष यांचे मनोगत: मा. श्री. धनराज राजमल जैन

स्पर्धेला प्रारंभ

आभार: प्रा. वाय. एम. नांद्रे, सुत्रसंचलन: डॉ. संजय खोडके






चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
पिंपळनेर एज्युकेशन
नॅक पुनर्मुल्यांकीत
पाटील कला,
कै. अण्णासाहेब
ता. साक्री जि. धुळे

# जागतिक महिला दिन निमित्त
# राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा
## दि. ११/०३/२०२१ चा निकाल

**प्रथम क्रमांक**

**चौधरी रूपाली कन्हैयालाल**

(कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर)

**२१०० रुपये रोख बक्षिस**

**द्वितीय क्रमांक**

**महाजन हिमानी विकास**

(डॉ. जी. डी. बेंडाळे महाविद्यालय, जळगाव)

**१५०० रुपये रोख बक्षिस**

**तृतीय क्रमांक**

**गवळी निशा जानकीराम**

(सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री)

**१००० रुपये रोख बक्षिस**

# ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

## प्रथम, व्दितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचे पारितोषिक देत सन्मान

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

कुटुंबात स्रीयांशी संवाद झाला पाहिजे. घरात सन्मान झालाच पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी केले. ते पिंपळनेर येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य महाविद्यालयात ऑनलाईन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटन कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कॉलेज कमिटीचे चेअरमन धनराज जैन तर उद्घाटक प्रा. डॉ. उषा साळुंखे, प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे, परिक्षक प्रा. डॉ. पौर्णिमा वानखेडे, भागवत सोनवणे हे उपस्थित होते.

प्राचार्य अहिरे पुढे म्हणाले की, स्रियांचे सौंदर्य हे छोटया छोटया गोष्टीत अर्थात त्यांचे चालणे, बोलणे, वागणे यामध्ये असते. त्यांच्या अंगी नम्रता, सहनशीलता इ. गुण असतात. असेही ते म्हणाले. प्रा. डॉ. उषा साळुंके यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात जैन म्हणाले कि, महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवित असते याचा मला विशेष आनंद आहे. असे सांगितले. या स्पर्धेत एकूण २१ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रथम क्रमांक चौधरी रूपाली, द्वितीय महाजन हिमानी, तृतीय क्रमांक गवळी निशा यांनी पटकाविला. परिक्षकांच्या वतीने प्रा.डॉ. पोर्णिमा वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. सी.एन.घरटे यांनी केले. परिचय प्रा. पी. एम. सावळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी तर आभार प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी केले.

Pimpalner Education Society's
KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND
KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,
PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

# INTERNATIONAL YOGA DAY

## आंतरराष्ट्रीय योग दिन

## (दि. २१ जुन २०२१)

कोरोनाच्या या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा असे आवाहन पिंपळनेर पोलिस स्टेशनचे पी.एस.आय. श्री. सचिन साळुंखे यांनी केले ते पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, योग शिक्षक प्रा.वाय.एम. नांद्रे, श्री. सुभाष जगताप हे उपस्थित होते.श्री. साळुंखे पुढे म्हणाले की, कर्मचाऱ्यांसाठी योगा प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला ही आनंदाची बाब आहे. हा उपक्रम अतिशय वाखाणण्यासारखा आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

योग शिक्षक वाय.एम. नांद्रे यांनी आयुष मंत्रालय निर्देशित विविध प्रकारची आसने व प्राणायाम यांचे प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांना दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे व प्रा.पी.एम. सावळे हे प्रयत्नशील होते.

Karmvee A. M. Patil Arts, Commerce & Annasaheb N. K. Patil Sci. Sr. College, Pimpalner, Tal. Sakri, Dhule














देशदूत २२।६।२१

# योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ जपा

## सपोनि सचिन साळुंखे यांचे प्रतिपादन; पिंपळनेर महाविद्यालयात कार्यक्रम

**पिंपळनेर । वार्ताहर**



कोरोनाच्या या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा, असे आवाहन पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सपोनि सचिन साळुंखे यांनी केले.

पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, योग शिक्षक प्रा.वाय.एम. नांद्रे, जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप हे उपस्थित होते. श्री.साळुंखे पुढे म्हणाले की, कर्मचाऱ्यांसाठी योगा प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला, हा उपक्रम अतिशय वाखाणण्यासारखा असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ लिखित जनरल केमिस्ट्री या संदर्भ ग्रंथाचे विमोचन देखील श्री. साळुंके व प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे, जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. के. डी. कदम यांच्या वॉक फोर सोसायटी या सामाजिक उपक्रमात देशभरातून सलग तीन वेळा द्वितीय क्रमांक व यावर्षी प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. योग शिक्षक वाय. एम. नांद्रे यांनी आयुष मंत्रालय निर्देशित विविध प्रकारची आसने व प्राणायाम यांचे प्रशिक्षण दिले. सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी.एन. घरटे, प्रा. पी.एम. सावळे हे प्रयत्नशील होते.

### विद्यार्थीनीचा सत्कार

कार्यक्रमाचे औचित्य साधत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तृतीय वर्ष पदार्थ विज्ञान शाखेतून संपूर्ण विद्यापीठातून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली व दोन सुवर्णपदकांची मानकरी ठरलेली वैभवी अनिल शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार सपोनि साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला.

सकाळ

# 'योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा'

सकाळ वृत्तसेवा

**पिंपळनेर, ता. २१ :** कोरोना या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा, असे आवाहन पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन साळुंखे यांनी केले. ते पिंपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, योगशिक्षक प्रा. वाय. एम. नांद्रे, ज्येष्ठ पत्रकार सुभाष जगताप अध्यक्षस्थानी होते. या वेळी तृतीय वर्ष पदार्थ विज्ञान शाखेतून संपूर्ण विद्यापीठातून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली



**पिंपळनेर : योग दिनप्रसंगी वैभवी शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार करताना सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन साळुंखे, प्राचार्य एस. टी. सोनवणे आदी.**

व दोन सुवर्णपदकांची मानकरी ठरलेली वैभवी शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ लिखित 'जनरल केमिस्ट्री' या संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. प्रा. के. डी. कदम यांच्या 'वॉक फोर सोसायटी' या सामाजिक उपक्रमात देशभरातून सलग तीन वेळा द्वितीय क्रमांक व यंदा प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे व प्रा. पी. एम. सावळे हे प्रयत्नशील होते.

## रोटरी स्कूलमध्ये ऑनलाइन योग दिन

निमगूळ, ता. २१ : दोंडाईचा येथील श्रीमती मंदाकिनी टोणगावकर रोटरी इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन ऑनलाइन पद्धतीने साजरा झाला. त्यात मुलांसह पालकांनीही सहभाग नोंदविला. शाळेचे अध्यक्ष हिमांशू शाह व प्राचार्य एम. पी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रश्नमंजूषा स्पर्धा, विद्यार्थ्यांकडून योगासनांचा ऑनलाइन सराव असा कार्यक्रम राबविला. तसेच पालकांनीही पाल्यांसोबत योगासने करत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. क्रीडाशिक्षक अजय हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासनाचे सादरीकरण केले. क्रीडाशिक्षक अजय हजारे यांनी योगामुळे



**दोंडाईचा : ऑनलाइन योगा करताना पालकांसह विद्यार्थी.**

व्यक्तिमत्त्व विकास व आध्यात्मिक शक्तीही वाढत असल्याचे सांगितले. डी. एम. पाटील व प्रशांत जाधव यांनी परिश्रम घेतले.

**पिंपळनेर येथे योग दिन**

**पिंपळनेर :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत भाजप पिंपळनेर मंडलाध्यक्ष मोहन सूर्यवंशी व महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रा. सविता पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळनेर, दहीवेल व आमखेल या तीनही ठिकाणी योग शिबिरांचे आयोजन केले होते. या वेळी योग प्रशिक्षक म्हणून पिंपळनेर येथे माधव पवार, दहीवेल येथे रवींद्र चौधरी, तर आमखेल येथे आर. टी. पवार उपस्थित होते. पिंपळनेर येथे मंडल सरचिटणीस प्रमोद गांगुर्डे, शहराध्यक्ष नितीन कोतकर, पंकज भावसार, उपाध्यक्ष प्रवीण देसले, रामलाल जगताप, सुनील माळी, ज्ञानेश्वर पवार, दत्तू बोरसे यांनी संयोजन केले.

Nashik, Dhule-Today
22/06/2021 Page No. 3



विद्यार्थिनीचा सत्कार करतांना सहायक पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे. सोबत इतर पदाधिकारी

## योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ जपा - सचिन साळुंखे

पिपळनेर - कोरोनाच्या या महाभयंकर कालावधीत योगाच्या माध्यमातून स्वतःचे स्वास्थ्य जपा असे आवाहन पिपळनेर पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक. सचिन साळुंखे यांनी केले.

पिपळनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे होते. यावेळी योग शिक्षक प्रा.वाय.एम. नांद्रे,पत्रकार. सुभाष जगताप हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तृतीय वर्ष पदार्थ विज्ञान शाखेतुन संपूर्ण विद्यापीठातून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली व दोन सुवर्णपदकांची मानकरी ठरलेली वैभवी अनिल शिंपी या विद्यार्थिनीचा सत्कार स.पो.नि. सचिन साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला. त्याच प्रमाणे प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ लिखित जनरल केमिस्ट्री या संदर्भ ग्रंथाचे विमोचन देखील साळुंके व प्राचार्य डॉ.एस.टी. सोनव सुभाष जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. के. डी. कदम यांच्या वॉक फोर सोसायटी या सामाजिक उपक्रमात देशभरातून सलग तीन वेळा द्वितीय क्रमांक व या वर्षी प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. एन. घरटे व प्रा.पी.एम. सावळे हे प्रयत्नशील होते.